दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ११७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२१ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# मूख्यमंत्री यांच्या हस्ते सपत्निक विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घातले पांडुरंगाच्या चरणी साकडे

**पंढरपूर (वृत्तसंस्था) : पंढरपुरात पुन्हा एकदा भक्तीसागर भरु दे. भक्तीरसात, टाळ-मृदंगाच्या गजरात तुझ्या ओढीची पायी वारी पुन्हा एकदा सुरु होऊ दे. यासाठी देवा आता कोरोनाचे संकट नष्ट होऊ दे. माझ्या महाराष्ट्राला आरोग्य संपन्नता लाभू दे, असे साकडे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज आषाढी एकादशीच्या महापुजेच्यावेळी पांडुरंगाच्या चरणी घातले. यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्यावतीने मुख्मंत्र्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.**



आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व सौ. रश्मी ठाकरे यांच्या हस्ते श्री. विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापुजा करण्यात आली. यावेळी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, पालकमंत्री दत्तात्रय भरणे, पंढरपूरच्या नगराध्यक्ष साधना भोसले, मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गाहिनाथ औसेकर, जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक दिलीप पांढरपट्टे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते उपस्थित होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, पुन्हा एकदा सर्वांना आनंदी आणि निरोगी आयुष्य जगू दे. कोरोनाच्या काळात नागरिकांच्यावतीने पाळण्यात येणारे सामाजिक मिटवू दे, वारकऱ्यांनी तुडूंब,आनंददायी, भगव्या पताक्यांनी भरलेलं पंढरपूर पहावयाचे आहे, असेही मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले. आज मंदिरात मी वृक्षारोपण केले. हा परंपरेचा वृक्ष असून याची पाळेमुळे जगभरात आणखी घट्ट होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मानाचे वारकरी विणेकरी केशव शिवदास कोलते, जि. वर्धा (वय ७१ वर्ष) यांचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते तर सौ. रश्मी ठाकरे यांच्या हस्ते सौ. इंदुबाई केशव कोलते (वय ६६ वर्ष) यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्यावतीने मानाचे वारकरी या नात्याने देण्यात येणाऱ्या एक वर्षाचा मोफत पास मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते त्यांना सुपूर्द करण्यात आला.

पंढरपूर नगरपरिषदेस राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या यात्रा अनुदानाच्या पाच कोटी रुपयांचा धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नगराध्यक्षा साधना भोसले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. महापुजेनंतर मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या छायाचित्राचे अनावरण करण्यात आले. मंदिर समितीने या छायाचित्राचे पुस्तक स्वरुपात जतन करुन हा वारसा जगापुढे ठेवावा, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गाहिनाथ औसेकर यांनी केले तर सुत्रसंचालन मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी विठ्ठल जोशी यांनी केले.

## संजय जांभळे पुन्हा शिवसेनेत ; आ.महेंद्र दळवी यांच्या हस्ते शिव बंधन बांधले



**दै.रायगड नगरी । पेण**

आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका नजरेसमोर ठेवून शिवसेनेने सुरु केलेल्या शिवसंपर्क अभियानात रायगडमधून शिव-सेनेला मोठा आक्रमक नेता मिळाल्यामुळे पेण तालुक्यातील शिवसेनेला उभारी येणार आहे. रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा माजी अर्थ आणि बांधकाम सभापती संजय जांभळे यांनी शिवसेनेत पुन्हा प्रवेश करीत आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते हातावर शिवबंधन बांधले आहे.

पक्ष प्रवेश केल्यानंतर प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना संजय जांभळे यांनी सांगितले की, काही मतभेदांमुळे मी शिवसेना सोडली होती. शिवसेनेमध्ये सामान्य शिवसैनिक म्हणून काम करताना पक्षश्रेष्टी जी जबाबदारी देतील ती यापुढे संभाळणार आहे. मी व माझी पत्नी हे शिवसेनेच्या तिकीटावर निवडून येऊन रायगड जिल्हा परिषदेमध्ये २००७ पासून अडीच वर्ष जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष होतो. माझ्यावर अर्थ आणि बांधकाम सभापती पदाची जबाबदारी देण्यात देण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. अडीच वर्षापुर्वी विधानसभा निवडणुकीपुर्वी त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला होता. भाजपा प्रवेशामुळे आमदार रवींद्र पाटील यांना पेण विधानसभा मतदार संघातून निवडणुक जिंकणे सोपे झाले होते. आता पुन्हा भाजपाला रामराम करत संजय जांभळे यांनी शिवसेनेचे शिवबंधन हातात बांधून घेतले आहे. त्यांच्या शिवसेना प्रवेशाने पेण तालुक्यातील शिवसेनेच्या पक्षबांधणीस बळकटी येणार आहे. त्याचबरोबर येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांना जेएसडब्ल्यू कंपनी, डोलवी औद्योगिक प्रकल्प, आदानी सिमेंट टर्मिनल्स मध्ये सक्षमपणे बाजू मांडता येणार आहे.

संजय जांभळे यांच्या प्रवेशाप्रसंगी शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख तथा आ.महेंद्र दळवी, शिवसेना उप जिल्हा प्रमुख नरेश गावंड, शिवसेना पेण तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे, अलिबाग तालुका प्रमुख राजा केणी, रोहा तालुका प्रमुख समीर शेडगे, दिपश्री पोटफोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## उलवे नोड येथील विविध क्षेत्रातील असंख्य नागरिकांचा शेकापमध्ये प्रवेश





**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील उलवे नोड येथील विविध क्षेत्रातील नागरिकांनी आ.बाळाराम पाटील व शेकापक्षाचे मा.नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

पनवेल तालुका सहकारी भातगिरणीचे उपसभापती राजेंद्र घरत, गव्हाणचे उपसरपंच सचिन घरत यांच्या नेतृत्वाखाली आ.बाळाराम पाटील व पनवेलचे आदर्श नगराध्यक्ष व शेकापक्षाचे मध्यवर्ती समितीचे सदस्य जे एम म्हात्रे, पनवेल पंचायत समितीचे मा.सदस्य शेकापक्षाचे जेष्ठ नेते रघुनाथ घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत उलवे नोड येथील विविध क्षेत्रांतील असंख्य नागरिकानी मोठ्या संख्येने शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला. उलवे भागातील शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते सचिन राजे व चिरंजीव सावंत यांच्या प्रयत्नाने हा भव्यदिव्य पक्ष प्रवेश सोहळा पार पडला.

## 'अवघे गर्जे पंढरपूर' ; विठूमाऊलीचा गजर आणि भक्तीचा अनुपम सोहळा

### १९ हजार ७०९ भक्तांनी घेतला लाभ



**दै.रायगड नगरी । पनवेल**

'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा' या अभंगाच्या ओळींप्रमाणे लेकुरवाळ्या असणाऱ्या विठुरायाला भेटण्याचा दिवस म्हणजे आषाढी एकादशी. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे लाखो भक्तांची वारी होऊ शकली नाही. लेकराला आईपासून दूर केल्यानंतर त्याची जी अवस्था होते तीच वारकऱ्यांची अवस्था झाली. मात्र असे असले तरी महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक पंडित उमेश चौधरी व तालमणी पंडित प्रतापराज पाटील या दोन दिग्गज कलाकारांनी 'अवघे गर्जे पंढरपूर' या धार्मिक कार्यक्रमाच्या सादरीकरणातून विठूमाऊलीचा गजर करून भक्तीचा अनुपम सोहळा घडवून आणला.

आषाढी एकादशी या दिवशी संपूर्ण आसमंत विठूनामाच्या गजराने दुमदुमतो आणि भक्तीचा दरवळ पसरतो. आषाढी वारीनिमित्त लाखो वारकरी पंढरपूरात पोहचतात. पण यंदाही कोरोनाचे सावट आणि राज्य सरकारने दिलेल्या निर्बंधामुळे लाखो वारकऱ्यांना वारीला मुकावे लागले आहे. परंतु विठूभक्तांची हिरमोड होऊ नये, तसेच भक्तमंडळींना भजन, आरती व दर्शनाचा लाभ व्हावा म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आज(मंगळवार, दि. २०) मल्हार टिव्ही व इतर सोशल मीडियाच्या माध्यमातून खारघर रांजणपाडा येथून थेट प्रक्षेपण करण्यात आले होते.

या सोहळ्यात पंडित उमेश चौधरी यांना पखवाज साथ पंडित प्रतापराज पाटील यांनी, तबला साथ कुणाल पाटील, गायनसाथ मंगेश चौधरी व अक्षय चौधरी, तर सुप्रिया जोशी यांनी संवादिनीची साथ दिली. तसेच या भक्तीमय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उस्ताद अजीम खान यांनी करून त्यांनी आपल्या सूत्रसंचालनातून संगीतामधून वारीचे महत्व .../२

## रोह्यात खड्ड्याने घेतला तरुणाचा जीव ; अपघातात संदीप जंगम यांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा शहरातील खड्डे अत्यंत धोकादायक झा-लेत. नागरिक जीव मुठीत घेऊन रहदारी करीत आहेत. त्यातच भुयारी गटार वाहिनी, भुयारी वीज वाहिनीसाठी सातत्याने खोदलेले खड्डे, भुयारी गटाराचे चेंबर जीवघेणे झालेत, याकडे वेळीच लक्ष द्या, खड्डे सामान्यांच्या जीवावर बेतेल, त्याच खड्ड्याने भुवनेश्वर येथील नागरीक संदीप जंगम यांचा सकाळी बळी घेतला. खड्ड्यात तोल जाता जाता मागावून येणा-या पीकअपने संदीप जंगम यांना जोरात धडक देत मागील चाकाखाली चिरडले. त्यात



जंगम यांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

रस्त्यात पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. याच झटापटीत हा भीषण अपघात झाल्याचे प्रथम दर्शनी समोर आले. संदीप जंगम यांचा खड्ड्यानेच जीव घेतला, या अपघाताला नगरपरीषद, सा. बा. खाते आणि लोकप्रतिनिधी यांना दोषी धरत गुन्हे दाखल करावेत, असा संताप नागरीकांनी सोशल मिडीयावर व्यक्त करीत प्रशासनाच्या कारभाराची चिरफाड केली आहे. संदीप जंगम वय ५२ हे दमखाडीकडून आपली दुचाकी घेऊन बाजारात जात असताना विटांनी भरलेल्या महेंद्र पीकअप गाडीने धडक दिली. त्यातील धडकेत जंगम खाली पडल्याने पीकअपच्या मागील चाक अंगावरुन गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

## पाताळगंगा नदीत वाहून गेलेल्या भावंडांपैकी मुलीचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । खालापूर**

तालुक्यामधील खोपोली क्रांतीनगरमधील रहिवासी असलेली दोन सख्खे भाऊ-बहीण पाताळगंगा नदीपात्रात वाहून गेले होते. यापैकी बहिणीचा मृतदेह आठ किमी अंतरावर सापडला.


पाताळगंगा नदीपात्रात निलंभ्भा श्रीकांत हंचलीकर (वय वर्षे ७) आणि बाबू श्रीकांत हंचलीकर (वय वर्षे ३) ही भावंडे सोमवारी सायंकाळी ५.३० ते ६.०० वाजण्याच्या दरम्यान वाहून गेली होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक प्रशासनाने शोध मोहिमेचे काम अपघातग्रस्त मदत पथक व खोपोली येथील स्थानिक नागरिक यांच्या मदतीने तात्काळ सुरु केले होते. सकाळी त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून साधारणतः आठ किलोमीटर अंतरावर निलंभ्भा हंचलीकर हिचा मृतदेह आढळून आला. तर बाबू हंचलीकर याचा शोध अद्याप सुरू आहे. दरम्यान, या घटनेने हंचलीकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## माथेरानमधील संत रोहिदास नगरचा भाग शिवसेनेच्या वाटेवर



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधून शिवसेनेच्या शिवसंपर्क अभियानाने उत्तुंग भरारी घेतली असून आजपर्यंत येथील संत रोहिदास नगर मधील बहुतांश लोकांनी स्वयंस्फूर्तीने, स्वेच्छेने शिवसेनेचे धनुष्य पेलण्यास सुरुवात केली असून अनेकजण शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत. यावेळी महिलांनी सुध्दा आपला मोर्चा शिवसेनेकडे वळविला असून जनसंपर्क कार्यालयात वीस पेक्षाही अधिक महिलांनी प्रवेश केला आहे. यासाठी या भागा-तील हेमा कदम यांनी पुढाकार घेतला होता त्यांनी या भागातील महिलांना एकत्रित करून पक्षाची ध्येयधोरणे पटवून दिल्यानंतर सर्व महिलांनी शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे.



कुठल्याही प्रकारची अभिलाषा न बाळगता माझ्या एका शब्दावर या महिला शिवसेनेत आल्या असल्याचे हेमा कदम यांनी सांगितले. त्यांनी योग्य पक्षाची निवड केली असून त्यांच्या निरनिराळ्या अडचणी, समस्या शिवसेनेच्या माध्यमातून संपुष्टात येणार आहेत. काहीही प्रश्न निर्माण झाल्यास त्यांनी शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, संपर्क प्रमुख प्रसादभाई सावंत यांना अथवा मला प्रत्यक्षात भेटून स्पष्ट .../२

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या रायगड जिल्हा सरचिटणीसपदी सुरेश मगर यांची निवड

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष, माजी आ.सुरेश लाड यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हा कार्यकारणी बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहे तालुक्याचे सुरेश मगर यांची रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली.



या बैठकीस पालकमंत्री अदीती तटकरे,आ.अनिकेत तटकरे, पक्ष निरीक्षक नेते शिवराम शिंदे,भाई टक्के, आलिबाग विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष नंदकुमार संजय वढावकर, रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष मधूकर पाटील, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, जेष्ठ म्हात्रे, रोहा शहर अध्यक्ष अमित उकडे, व रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवडी नंतर सूरेश मगर यांनी खा.सुनिल तटकरे यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवत पक्ष संघटनेची जबाबदारी दिली आहे.हा विश्वास सार्थ करीत त्यांना अभिप्रेत अस-लेले व पालकमंत्री आदीती तटकरे तसेच आ.अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना वाढीसाठी काम करणार असल्याचे सांगितले.

# कळंबोली परिसरातील घरांच्या मालमत्ता कर वसूलीस स्थगिती देण्याची शिवसेनेची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली परिसरातील घरांच्या मालमत्ता कर वसूलीस स्थगिती द्यावी तसेच नुकत्याच अतिवृष्टीमुळे झालेल्या घरांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपायी द्यावी अशी मागणी आज शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत व महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेऊन केली.



दोन दिवसांपूर्वी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अतिवृष्टी होऊन कळंबोली येथील एलआयजी तथा केएल ३, ४ व ५ या भागात पाण्याचा योग्य तऱ्हेने निचरा न झाल्याने घरात तसेच सोसायटीत पाणी साचून गरीब व माथाडी कामगारांच्या घरात पाणी शिरले. तसेच त्यांच्या मालमत्तेचे अपरिमित असे नुकसान झालेले आहे. आधीच कोव्हिड संसर्गजन्य रोगामुळे गरीब लोकांचा आर्थिक कणा मोडला होता. यातच महानगरपालिकेच्या व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे नाले सफाई तथा खराब विद्युत पंपामुळे सामान्य जनतेची घरे पाण्याखाली बुडाली होती. तरी या गरीब जनतेचे अतिवृष्टीमुळे मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. माथाडी बांधवांचेसुद्धा मोठे नुकसान झाल्याने कळंबोली परिसरातील घरांच्या मालमत्ता कर वसूलीस स्थगिती द्यावी तसेच नुकत्याच अतिवृष्टीमुळे झालेल्या घरांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपायी द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

---

अर्जदाराचे वकील : ॲड.विपुल रमाकांत ठाकूर

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्त्र यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/८/२१

१) श्रीमती.इंदू जगदीश भोईर
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.अमित जगदीश भोईर
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.अजित जगदीश भोईर
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
वरील रा.१ ते ३ पत्ता : घर नं.२३३७,
गणपती मंदिर जवळ, बालई उरण,
ता.उरण, जि.रायगड-४००७०२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. जगदीश पांडुरंग भोईर यांचे निधन रा.मु.पो.काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.जगदीश पांडुरंग भोईर यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.जगदीश पांडुरंग भोईर यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : काळाधोंडा ४७ | ५ | ३ | ०-१-३ |
| २ | | ६ | २ | ०-२७-० |
| ३ | | ८ अ | २ | ०-२-८ |
| ४ | | ११ | ३ | ०-१०-० |
| ५ | | ११ | ५ | ०-१२-७ |
| ६ | | ७९ | ३ | ०-०-८ |
| ७ | | ७९ | ६ | ०-१४-८ |
| ८ | | ८१ | ३ | ०-०३-५ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.जगदीश पांडुरंग भोईर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून मा.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत घ्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२०/०७/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक, दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.क.स्तर, उरण

---

मे.मुजावर साहेब

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६३७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/८/२१

१) श्रीमती.विद्या अनिल श्रृंगारपुरे
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अंकित अनिल श्रृंगारपुरे
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
दोघेही रा.बी/६०३, शिवकुमार सोसायटी,
विलेपार्ले पुर्व, मुंबई-४०००५७ — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ यांचे पती व नं.२ यांचे वडील कै.अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे हे दि.१३/०१/२०२० रोजी मयत झाले असून कै.अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे यांच्या नावाने खालील वर्णनाची सामाईक मालकीची मिळकत मौजे : पाली बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथे नोंदीत असून सदर मिळकतीचे कै.अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे हे रितसर मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पालीबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १७ | १ | ०-०७-० | ०.१९ |
| १७ | ३ | ०-०४-० | ०.०६ |
| १०१ | १ | ०-०६-१० | ०.१६ |
| ११७ | १ | ०-१४-० | ०.०९ |
| ७८ | २ | १-२७-५० | २.९१ |

येणेप्रमाणे मिळकतींचे वर्णन असून, सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने कै.अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे यांच्या हिश्श्यापुरता वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे यांचे त्यांच्या हिश्श्यापुरते कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मे.मुजावर साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲडा.जितेंद्र कुमार पांडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.८४९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/८/२१

श्रीमती.योगिता सुधाकर पाटील व इतर ३ अर्जदार
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.फ्लॅट ३०२, ओम नम शिवाय को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं.२१, सेक्टर १६, कळंबोली, नवी मुंबई,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की,

१) अर्जदाराची पती कै.सुधाकर गजानन पाटील हे एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल येथे दि.०८/०३/२०२० रोजी मरण पावले. अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

२) मृत्यूसमयी कै.सुधाकर गजानन पाटील यांच्या नावे कळंबोली, नवी मुंबई, पनवेल महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाची मिळकत होती. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**स्थावर मालमत्ता**
**फ्लॅट नं.३०१, ३०२, ३०४ ओम नम शिवाय को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.२१, सेक्टर १६, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८**

अर्जदार हे कै.सुधाकर गजानन पाटील यांचे वारस आहेत. वरील मिळकत ही मयत सुधाकर गजानन पाटील यांनी विकत घेतली होती आता ती अर्जदारास त्याच्या नावे करायची आहे. म्हणून सिडको/पनवेल महानगरपालिका ऑथरिटीने मे.कोर्टाकडून वारस दाखला मागितला आहे. यासाठी अर्जदाराने कोर्टात अर्ज दाखल केला आहे. ज्या कुणीही व्यक्तीला याबाबतीत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात १ महिन्याच्या आत हजर राहून किंवा वकीलामार्फत हरकत घ्यायची आहे. योग्य मुदतीत हरकत न आली नाही तर मे.कोर्ट हक्काबद्दल पुरावा घेण्याची कारवाई करेल आणि जर अर्जदार हे कै.सुधाकर गजानन पाटील यांचे वारस आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१६/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

ॲड.सुनील एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७७९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/८/२१

१) श्रीमती.स्नेहल सुरेंद्र सावंत
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : घरकाम
२) कुमारी.हर्षदा सुरेंद्र सावंत
वय : २० वर्षे, व्यवसाय : शिक्षण
दोघेही रा.फ्लॅट नं.ए/९०२,
नववा मजला, सिल्वर स्टार,
प्लॉट नं.५०, ६३, ६४, ६५
सेक्टर १८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती, अर्जदार नं.२ हिचे वडील कै.सुरेंद्र नारायण सावंत यांच्या नावाने सिडकोकडे नोंदीत आहे. अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ हिचे वडील कै.सुरेंद्र नारायण सावंत हे दि.०८/०५/२०२१ रोजी मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटल, बृहन्मुंबई महानगरपालिका ए विभाग, ता. व जि.मुंबई या हॉस्पिटलमध्ये मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ हिची आजी कै.सुवर्णा नारायण सावंत या दि.४/०५/२००५ मु.पो.वायंगणी, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथे राहत्या घरी मयत झालेल्या असून त्यांच्या मृत्यूची नोंद सरकारी कार्यालयात केलेली नाही. कै.सुरेंद्र नारायण सावंत यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील सदनिका नं.ए/९०२, नववा मजला, सिल्वर स्टार, प्लॉट नं. ५०, ६३, ६४, ६५, सेक्टर नं.१८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदाराच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२०/०७/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

## म्हसळा नगर पंचायत, म्हसळा

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळानगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्या प्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/८८७/२०२१ दिनांक :- २०/०७/२०२१

| अ. क्र | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रमाक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ६९५ अ | कुंभारवाडा | कौलारु सिमेंट रेतीत बांधलेले घर | शमसुनिस्सा अ.सत्तार दरोगे | शाहीन अ.सत्तार दरोगे |
| २ | २ | ५६१,५६१अ,५६२,१०५५, १०८९,१५०८ पैकी | दिघीरोड | आर. सी.सी पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं.११२ | मयूर विनोद बनकर | सुचिता भालचंद्र नाक्ती<br>अंकेत भालचंद्र नाक्ती |
| ३ | २ | ७८९ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | जमादार कॉम्प्लेक्स / आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत ग्राउंड फ्लोअर फ्लॅट नं.५ | शगुप्ता साजीद जमादार<br>सना नविद बलडे<br>शफिया फौझान दामाद<br>सादिया साजीद जमादार | मोहसीन मुबश्शीर जमादार |
| ४ | २ | ७८९ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | जमादार कॉम्प्लेक्स / आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०३ | शगुप्ता साजीद जमादार<br>सना नविद बलडे<br>शफिया फौझान दामाद<br>सादिया साजीद जमादार | मोहसीन मुबश्शीर जमादार |
| ५ | २ | ७८९ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | जमादार कॉम्प्लेक्स / आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०२ | शगुप्ता साजीद जमादार<br>सना नविद बलडे<br>शफिया फौझान दामाद<br>सादिया साजीद जमादार | मोहसीन मुबश्शीर जमादार |
| ६ | ३ | १०६३ | नवानगर | कौलारु चिखल मातीत बांधलेले घर | नुरुद्दीन हसन जंजीरकर | सुलताना जब्बार वस्ता |
| ७ | ३ | १४६६ | कुंभारवाडा | सिमेंट पत्रे सिमेंट रेतीत बांधलेले घर इंदिरा आवास घरकुल योजना | सुमित्रा दाजी जंगम | रजनी रविंद्र जंगम<br>राकेश रविंद्र जंगम<br>रेखा रविंद्र जंगम<br>रेणूका रविंद्र जंगम<br>संगिता दाजी जंगम |
| ८ | ३ | ११२८ | दिघीरोड | कौलारु सिमेंट रेतीत बांधलेले घर | मुनवर मुनीर जमादार | मुनीर अहमद अब्दुल अजीज जमादार<br>तमीम मुनीर जमादार<br>मुईझ मुनीर जमादार |
| ९ | ३ | १०२३ | दिघीरोड | कमर्शियल / आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली तळ मजला | मुनवर मुनीर जमादार | मुनीर अहमद अब्दुल अजीज जमादार<br>तमीम मुनीर जमादार<br>मुईझ मुनीर जमादार |
| १० | ३ | १०२३ अ | दिघीरोड | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला | मुनवर मुनीर जमादार | मुनीर अहमद अब्दुल अजीज जमादार<br>तमीम मुनीर जमादार<br>मुईझ मुनीर जमादार |
| ११ | ३ | १९९० | दिघीरोड | कमर्शियल तळ मजला गाळा नं. १ व २<br>आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. १ व २ | मुनवर मुनीर जमादार | मुनीर अहमद अब्दुल अजीज जमादार<br>तमीम मुनीर जमादार<br>मुईझ मुनीर जमादार |
| १२ | ३ | ५८८ अ | सावर | कौलारू चिखल मातीत सिमेंट रेतीत प्लास्टर केलेले घर व वाडा | यशवंत पांडुरंग दिवेकर | रुक्मिणी यशवंत दिवेकर<br>संजय यशवंत दिवेकर<br>विजय यशवंत दिवेकर<br>रचना राजाराम धुमाळ<br>नमिता अनंत रिकामे |
| १३ | २ | १७६४ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०२ व २०३ | रियाझ हाजिमिया घराडे | लियाकत अली गुल्ले खान |
| १४ | २ | ९५२ पैकी | कुंभारवाडा | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं.३ | शांताराम आत्माराम बोरकर | अनिकेत अनंत जंगम |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालील नमूद केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक संतोष एन. गायकवाड यांच्या स्वतःच्या मालकीचे ताबेकब्जा, वहिवाटीत ७/१२ सदरी आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २४४ | ० | ००-४९-८०<br>पो.ख.००-००-५० | १०.०६ |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकती संदर्भात कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अगर कोणताही दावा, महसूलवाद असल्यास या संदर्भात त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. मात्र हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध / निर्विवाद आहे असे समजले जाईल. तसेच वर नमूद केलेल्या जमीन मिळकती संदर्भात मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. मुदती बाह्य आलेली कोणतीही हरकत वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०७/२०२१

सही/-
ॲड.एस.एन.गायकवाड
ऑफिस नं.०२, हरिदर्शन सोसायटी,
प्लॉट नं.९०, सेक्टर २१,
कामोठे, नवी मुंबई ४१०२०९

---

# बडोदा बँकेचा ११४ वा वर्धापन दिन साजरा

दै.रायगड नगरी । कळंबोली

बँक व आर्थिक क्षेत्रात अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या बँक ऑफ बडोदा ११४ वा वर्धापन दिन कामोठे येथील शाखेत निवृत्त कर्मचारी व ग्राहकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी बँकिंग विषयी धोरण सद्यस्थितीत कोणाचा अस-लेला प्रसार रोखण्यासंदर्भात ग्राहकांशी हितगुज साधण्यात आले. बँकिंग क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या व देशभरात बँकांचे जाळे असणाऱ्या बँक ऑफ बडोदा बँकेला ११४ वर्ष पूर्ण झाले आहेत. बँकेच्या विविध शाखांतून वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# विठूमाऊलीचा गजर आणि भक्तीचा अनुपम सोहळा

भाविकांसमोर मांडले. वारी हि वारकऱ्यांची साधना आहे. गेल्या दोन वर्षांत कोरोना महामारीमुळे या साधनेत व्यत्यय निर्माण झाला असला तरी 'पंढरीची वारी आहे माझ्या घरी' या उक्तिप्रमाणे वारकऱ्यांचा निश्चय कायम आहे. दुःखनाश, संतसंगती, पारलौकिक सुख आणि धर्म या चार गोष्टींसाठी वारी महत्वाची मानली जाते. त्यामुळे 'चुकलिया माय व बाळ हुरहूरा पाहे ख खे तैसे झाले माझ्या जीवाख केव्हा भेटशी केशवा' अशी परिस्थिती असली तरी थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून झालेल्या या वारी दर्शन अनुपम सोहळ्याचा १९ हजार ७०९ भक्तांनी लाभ घेतला.

# माथेरानमधील संत रोहिदास नगरचा भाग शिवसेनेच्या वाटेवर

केल्यास सर्व काही प्रश्न सुटतील असे शिवसेनेच्या महिला संघटक संगीता जांभळे यांनी सांगितले. विशेष म्हणजे भाजप मधून शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारणारे अल्ताफ शेख यांचाही यावेळी विशेष सत्कार चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आला. याच प्रभाग चार मधून संतोष कदम, उद्धव सोनावणे या युवकांनी सुध्दा शिवसेनेच्या एकंदरीत कार्यपद्धतीवर खुश होऊन शिवबंधन बांधले आहे. शिवसेनेच्या महिलांनी एवढे दिवस पक्ष बळकटी साठी अपार मेहनत घेतली होती त्याचीच पोचपावती म्हणून आज गावातील सर्वसामान्य महिलांनी शिवसेनेची कास धरली आहे त्यांना सुध्दा विश्वास आहे की या गावाचा विकास आणि सर्वांगीण विकासासाठी शिवसेने शिवाय पर्याय उरलेला नाही त्यामुळे हे पक्षप्रवेशाचे चित्र सर्व काही सांगून जात आहे. अन्य पक्षांनी उलटसुलट चर्चा करण्यात वेळ आणि आपली ऊर्जा व्यर्थ खर्च करू नये नगरपरिषदेवर भगवा फडकविण्यासाठी हा वाढता समुदाय खूप काही करू शकतो असे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांनी स्पष्ट केले. प्रिया गुरव, निकिता गुरव, ज्योती गुरव, सुनंदा पवार, सुनीता पवार, छाया पवार, दामिनी पवार, अर्चना पाटील, स्वाती सावंत, अक्ताफ शेख, संतोष कदम आणि उद्धव सोनावणे यांचा प्रवेश उपस्थितांच्या हस्ते करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# रा.जि.प.केंद्र वैजनाथमध्ये वृक्षारोपण व शाळांना संगणक वाटप



**दै.रायगड नगरी । माथेरान**

रायगड जिल्हा परिषद वैजनाथ केंद्रातील भालीवडी शासकीय आश्रमशाळेत केंद्रातील शिक्षक व रोटरी क्लब ऑफ देवनारचे वतीने ५० फळझाडे मान्यवरांच्या हस्ते लावण्यात आली.

शिवाय रोटरी क्लबतर्फे जिल्हा परिषद शाळा हुमगाव, आधारवाडी, शेलू, कलम उर्दू, नेरळ कन्या, विद्याविकास नेरळ, यांना संगणक व प्रिंटर वाटप करण्यात आले. वैजनाथ केंद्रात प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये जलशुध्दीकरण प्रकल्प रोटरी क्लब यांनी बसवून दिले.

हे जलशुध्दीकरण प्रकल्प सुरू करण्याच्या कार्यात वैजनाथ केंद्राचे केंद्रप्रमुख नारायण भिकू सोनवणे यांनी सुरुवातीपासून मोलाचे योगदान दिल्याकारणे रोटरी क्लब ऑफ देवनार, मुंबईतर्फे सोनवणे यांना प्रमाणपत्र देवून रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रबोध शर्मा यांनी सन्मानित केले.

या प्रसंगी सोनवणे यांनी केंद्रातील शाळांसाठी लॅपटॉप, टॅबची मागणी ऑनलाईन शिक्षण विद्यार्थ्यांना घेण्यात सुकर होण्याकरिता केली. कार्यक्रमात केंद्रातील शिक्षक संतोष देशमुख सर आणि अर्चना देशमुख यांच्या कार्याचा सत्कार करण्यात आला. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक यांनी कार्यक्रमात उत्तम सहभाग घेतला. कोरोना १९ चे सर्व नियम पालन करीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रबोध शर्मा, सुधीर मेहता, कनम सर, अर्जुन तरे, बागडे गुरुजी, पद्मा मॅडम, संजय मेहता सर आणि वैजनाथ केंद्रातील मुख्याध्यापक उपस्थित होते.

अर्जदाराचे वकील
अॅड.स्वानंद भा. नवाळे

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.ज्युडिशीयल मॅजिस्ट्रेट प्रथमवर्ग यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.९७/२०२१
नि.नं.६/ड
ने.ता.२०/०८/२०२१

श्री.सुरेश जगन्नाथ पाटील — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामपंचायत बोकडविरा — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचा दि.०२/०८/१९७८ रोजी ठिकाण मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड या मुक्कामी जन्म झालेला आहे. अर्जदार यांच्या जन्माची नोंद होण्याकरिता उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांचा जन्म वरील नमूद केलेलया ठिकाणी झालेला आहे. त्याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून त्यांस सदरहू व्यक्तीच्या जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येतील. आज दि.२०/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, उरण

## हरविले आहे

माझे अशिल श्री.कलीम खलील काझी यांच्या ताब्यातील मुसलमान नाका अलमिदाहा रेसिडेन्सी स.नं.119/बी, 120/0, 12/012, 231 अ 1A 3A वरील इमारतीतील फ्लॅट ०२ स्टील फ्लोअर क्षेत्र ४३३ चौ.फूट कारपेट व टेरेस ८७ चौ.फूटचे दस्त क्र.1370/2009 दि.०७/०३/२००९ हे पनवेल परिसरात कोठेतरी पडून गहाळ झाले आहेत.

याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे मिसिंग रजि नं.११७४/२०२१ दि.१६/०७/२०२१ रोजी नोंद केली आहे. सदरचे दस्ताऐवज कोणाला सापडल्यास किंवा त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध १४ दिवसाच्या आत कळवाव्यात.वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल सदर फ्लॅटच्या विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**अॅड.रेवती क. ठाकूर**
**फ्लॅट नं.००१, तळमजला, बिल्डींग नं.५ ए,**
**मेरीगोल्ड को.ऑप.हौ.सोसा.**
**मु.पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं. ७४९८१०१०१३/९८९२८७५२९९**

# पनवेल शहरातून रिक्षाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील कुलकर्णी हॉस्पिटलसमोर उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

देवदत्त रोटे (४८) यांची ४५ हजार रुपये किंमतीची काळ्या पिवळ्या रंगाची ऑटो रिक्षा क्र.एमएच-४६-एसी-३९२४ ही शहा प्लाझा बिल्डींग कुलकर्णी दवाखान्याजवळ प्रभु आळी येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षा चोरुन नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# क्वॉलिटस गार्डन सोसायटीच्या मागे आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील क्वॉलिटस गार्डन सोसायटीच्या मागे गाढी नदीच्या पात्रात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, उंची ५ फूट ५ इंच, डोक्यावर केस नाही, चेहरा गोल, दाढी मिशी नाही. अंगात काळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टी-शर्ट, कंबरेला करदोडा व त्यास कोळी पो-शाखाचा हिरव्या लाल रंगाचा रुमाल आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२४४४ किंवा पोलीस हवा. आर.पी.म्हात्रे भ्रमणध्वनी ८३५६८३१५७१ यांच्याशी संपर्क साधावा.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-बुधवार दि.२१ जुलै २०२१ रोजी सकाळी ९.०० वा. सुनिती शासकीय निवासस्थान येथून शासकीय वाहनाने वरसे ता.रोहाकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. वरसे येथे आगमन व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी. दुपारी १.१५ वा. वरसे, ता.रोहा येथून शासकीय वाहनाने रोहाकडे प्रयाण. दुपारी १.३० वा. रोहा येथे आगमन व रोहा तसेच अष्टमी येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी. सोईनुसार रोहा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण. सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

# ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ

**ता.पनवेल, जि.रायगड**

## :- निविदा सूचना -:

मा.सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ ता.पनवेल, जि.रायगड यांच्या वतीने खाली स्वाक्षरी करणारे खाली नमूद केलेल्या कामासाठी टक्केवारी दराने मोहरबंद निविदा मागवीत आहेत तरी निवेदने पत्रे सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ ता.पनवेल, जि.रायगड यांच्या कार्यालयात कामाच्या दिवशी दिनांक -२१/०७/२०२१ ते २७/०७/२०२१ अखेरपर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० कुंडेवहाळ पर्यंत निविदा फॉर्म मिळतील मोहरबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालय कुंडेवहाळ ता.पनवेल, यांच्या कार्यालयात दि.२७/०७/२०२१ रोजी सकाळी ११:०० कुंडेवहाळ पर्यंत स्वीकारण्यात येतील.शक्य झाल्यास त्या दिवशी दुपारी किंवा सरपंच ठरवतील त्या दिवशी निविदा ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील.

उघडलेल्या सर्व निविदा तुलनात्मक पत्रासहित पुढील मंजुरीसाठी खाली सही करणारा सरपंच ग्रामपंचायत कुंडेवहाळ यांचे कडे सादर करण्यात येते.सर्व निविदा स्वीकारणे किंवा फेटाळण्याचे हक्क खाली सही करणाऱ्यांनी राखून ठेवले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अं.प.रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|
| १) | कुंडेवहाळ,दंडाचीवाडी,बंबावी येथे डसबीन वाटप करणे. (१५ वित्त) | ३९५३१०/- | ३० दिवस | |
| २) | कुंडेवहाळ, बंबावी, दंडाचीवाडी शाळा दुरुस्ती करणे व शाळा साहित्य पुरविणे. (१५ वित्त आयोग) | १०००००/- | ३० दिवस | |
| ३) | ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ हद्दीतील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करणे व साहित्य पुरविणे. (१५ वित्त आयोग) | ५००००/- | ३० दिवस | |
| ४) | कुंडेवहाळ मराठी शाळेच्या बाजूला परसबाग तयार करणे व लागणारे खेळाचे साहित्य पुरविणे. (१५ वित्त आयोग) | ३४०५५०/- | ३० दिवस | |
| ५) | ग्रामपंचायत ऑफिसच्या बाजूला परसबागेत लहान मुलांसाठी खेळणी व बाकडे बसविणे. (ग्रामनिधी) | २०००००/- | ३० दिवस | |
| ६) | ग्रामपंचायत हद्दीमध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरा बसविणे. (ग्रामनिधी) | ४०००००/- | ३० दिवस | |
| ७) | ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ हद्दीतील प्रा.शाळा व अंगणवाडी मुलांसाठी गणवेश, बाकडे, दफ्तर, चप्पल, छत्री इ.खरेदी करणे. (वित्त आयोग) | २५८६६५/- | ३० दिवस | |
| ८) | ग्रामपंचायत हद्दीतील किशोरवयीन मुलीना प्रयोगिक तत्वावर नॅपकीन वाटप करण्यासाठी खरेदी करणे. (१५ वित्त आयोग) | ४००००/- | ३० दिवस | |
| ९) | ग्रामपंचायत हद्दीतील जेष्ठ नागरिक व महिला आरोग्य तपासणी करणे व उपाययोजने संबधी साहित्य वाटप करणे. (वित्त आयोग) | ४३४६७/- | ३० दिवस | |
| १०) | ग्रामपंचायत हद्दीतील जेष्ठ नागरिक तपासणी व साहित्य पुरविणे. (वित्त आयोग) | १२३६६५/- | ३० दिवस | |
| ११) | कुंडेवहाळ, बंबावी, दंडाचीवाडी किरकोळ दुरुस्ती करणे, लाईट बिल भरणे व साहित्य पुरवठा करणे. (वित्त आयोग) | १३५०००/- | ३० दिवस | |
| १२) | कुंडेवहाळ गावातील वैयक्तिक सुका कचरा व ओला कचरा टाकण्यासाठी कचरा कुंड्या खरेदी करणे. (वित्त आयोग) | ७००००/- | ३० दिवस | |
| १३) | कुंडेवहाळ ग्रामपंचायत अंतर्गत वृक्ष लागवड करणे व खड्डे खोदणे मशिन व ग्रास कटर मशिन खरेदी करणे. (वित्त आयोग) | ८००००/- | ३० दिवस | |
| १४) | ग्रामपंचायत हद्दीत फवारणी करणे व साहित्य खरेदी करणे. (ग्रामनिधी) | १८४०००/- | ३० दिवस | |
| १५) | क्लोरीवॅट बॉटल खरेदी करणे व टीसीएल खरेदी करणे.(ग्रामनिधी) | १०००००/- | ३० दिवस | |
| १६) | ग्रामपंचायत हद्दीतील किशोरवयीन मुलीना प्रयोगिक तत्वावर नॅपकीन वाटप करण्यासाठी खरेदी करणे. (१४ वित्त आयोग २०१९-२०) | ४२०००/- | ३० दिवस | |
| १७) | कुंडेवहाळ बंबावी व दंडाची वाडी शाळांना पुस्तके व कपाटे (ग्रंथालय साहित्य) देणे. (१४ वित्त आयोग २०१९-२०) | १८६०२१/- | ३०दिवस | |

अटी व शर्ती :-

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

६) साहित्याचे व वस्तूचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ**

# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक-१ पनवेल यांचे कार्यालय

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम क्रमांक ११ ची अधिसूचना

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक ११/२०१४/प्र.क्र.७७ (पार्ट-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमिसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या 'अनुसूची एक' मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या 'अनुसूचि दोन' मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या 'अधिसूचि तीन' मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या 'अनुसूचि चार' मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या 'अनुसूचि चार' मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिानियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकांस उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सुट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अ नुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांस पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव : ओवळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | १/३ | ०.२३.८० |
| २ | १/४ | ०.२२.८० |
| ३ | १४/७ | ०.०१.३० |

### अनुसूची-दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| अधिसूचना प्रकल्पाचे नांव : | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तद्नुषंगिक कामे |
| निर्माण प्रकल्प कार्याचे वर्णन : | नवी मुंबई विमानतळ क्षेत्रामध्ये प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तद्नुषंगिक कामे या राष्ट्रीय महत्वाकांक्षी प्रकल्पाकरिता जमीन संपादन करणे |
| करण्यापूर्वी समाजाला मिळणारे लाभ : | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे नियोजित नागरी सुविधांचा लाभ समाजातील सर्वच स्तरातील लोकांना होईल. |

### अनुसूची-तीन

| | |
|---|---|
| बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यांस भाग पाडणारी कारणे : | प्रस्तावित जमिनीच्या भूसंपादनामुळे ८ कुटुंबे विस्थापित होतील. |

### अनुसूची-चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश**

ओवळे येथील ०-४७-९० हे.आर. ही जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडको करिता नवीन भूसंपादन कायद्यांतर्गत करण्यात येत आहे. नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंतर्भाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवीन प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यावर पोहोचला आहे. खऱ्या अर्थाने मुंबईला पर्याय म्हणून हे शहर विकसित झाले आहे. नवी मुंबई विमानतळाच्या कामाने वेग घेतला असून याचा मोठा फायदा आजूबाजूच्या गावांना होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे निर्माण कार्य प्रगतीपथावर असल्याने ओवळे गावाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. विमानतळ परिसरात लागणाऱ्या सोयी सुविधाकरिता ओवळे गावातील जमीन भूसंपादनाकरिता प्रस्तावित आहे. विमानतळ परिसरातील नागरी सुविधांकरिता सदर जमिनीची नितांत आवश्यकता आहे. सदर जागेचा वापर विविध नागरी सुविधांकरिता होणार असल्याने अंतिमतः याचा लाभ समाजाला होणार आहे.

### अनुसूची-तीन

| | |
|---|---|
| नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल : | प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली नाही. |

ठिकाण : पनवेल दिनांक १४/०७/२०२१

**सही/-**
**(वैशाली परदेशी-ठाकूर)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**मेट्रो सेंटर क्रमांक-१ पनवेल**

जिमाका/राअ/जाहि/७३/२०२१-२२

# उरणच्या काँग्रेस कार्यालयात महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत स्व. मधुकर ठाकूर यांची शोकसभा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुका काँग्रेस कमिटी व उरण शहर काँग्रेस कमिटी यांच्या वतीने संध्याकाळी अलिबाग –उरणचे माजी आमदार स्व.मधुकर ठाकूर यांच्या स्मृर्तीस आदरांजली वाहण्यासाठी उरण काँग्रेसच्या कार्यालयात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्व. मधुकर ठाकूर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या वेळी कामगार नेते महेंद्र घरत यांनी स्व. मधुकर ठाकूर यांना आदरांजली वाहताना सांगितले की, मधुकर ठाकूर हे सर्व सामान्य जनतेचे नेते होते. त्यांनी नेहमीच गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडविले आहेत.




आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात जिल्हा परिषद सद्स्या पासुन केली होती. सतत जनतेच्या संपर्कात असणारे नेते म्हणून अलिबाग तालुका आणि रायगड जिल्ह्यात त्यांची ओळख होती.उरण विधानसभा मतदार संघात शेतकरी कामगार पक्षाची मक्तेदारी मोडीत काढत त्यांनी अलिबाग –उरण मतदार संघातून निवडून येण्याची किमया साधली. हा त्यांच्या कार्याचा खरा विजय होता. व या मतदार संघातून निवडून येण्याचा चमत्कार देखील त्यांनी केला.सतत लोकांच्यात राहुन त्यांच्या हाकेला धाऊन जाऊन ते प्रश्न तडीस नेणे व सर्वसामान्य जनतेला न्याय देत ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत झटत राहिले.

काँग्रेस पक्षाशी ते एकनिष्ठ राहिले.त्यांची ओळख हि काँग्रेस कार्यकर्ता ते नेता अशी होती.त्याचं राहणीमान हे अत्यंत साधेपणाचे होते. त्यांच्या बोलण्यात कुठलाच अविर्भाव नसायचा सर्वांशी ते प्रेमाने वागायचे. त्यांच्या जाण्याने रायगड जिल्ह्यात काँग्रेसची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री मिलिंद–जी पाडगावकर, सरचिटणीस. महेंद्र ठाकूर, कोकण मच्छिमार संघांचे अध्यक्ष मार्तंड नाखवा,उरण शहर काँग्रेसचे अध्यक्ष किरिट पाटील, प्रभारी अखलाक शिलोत्री,शहर महिला अध्यक्षा आफशा मुकरी मॅडम,अविनाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुरुड मधील राजपुरी दरडग्रस्त भागाला भाजपचे जिल्हाध्यक्ष महेश मोहिते याची भेट

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुडमध्ये नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे राजपुरी सह अनेक डोंगरी भागात दरड कोसळल्या, रायगडचे भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष अॅड महेश मोहिते यांनी राजपुरी दरडग्रस्त भागात नुकतीच भेट देऊन दरड कोसळलेल्या भागाची पाहणी केली.

त्यावेळी त्यांच्या निदर्शनात आले की ज्या डोंगर भागात राजपुरी गाव वसले आहे तेथे अनेक ठिकाणी डोंगराला भेगा पडल्या आहेत व त्या भेगा रुंदावल्या आहेत तेथील परिस्थिती अत्यंत धोकादायक असून केव्हाही मोठा अपघात होण्याची दाट शक्यता आहे. दरडीमुळे डोंगरावरील घरे केव्हाही कोलमडू शकतात असे मोहिते यांनी सांगितले. तसेच याचे गांभीर्य ओळखून त्यांनी रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी व रायगडचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे यांच्या सोबत चर्चा करून त्यांचा ही बाब लक्षात आणून देऊन शासकीय यंत्रणा त्वरित कार्यान्वित करण्याची मागणी केली व मुरूडचे तहसीलदार गमन गावित व पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांना घटनास्थळी बोलावून त्यांच्या ही बाब निदर्शनात आणून दिली तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने गावातील लोकांना त्वरित विस्थापित करण्याची मागणी केली व गावातील लोकांना याचे गांभीर्य लक्षात आणून देऊन सतर्क राहण्याचा इशारा दिला तसेच भूगर्भ शास्त्रज्ञांना बोलावून सदर ठिकाणी दरड कोसळण्याची किती शक्यता आहे ते पडताळून पाहण्याचीही मागणी केली. याप्रसंगी निलेश महाडिक, भाजप तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, महेश मानकर इत्यादी उपस्थित होते.

## शिरढोण येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पनवेल तालुक्यातील दुर्गम, डोंगराळ व आदिवासी बहुल भागात मंडळ अधिकारी व तलाठी सजे यांना स्वत:चे कार्यालय उपलब्ध नसल्याने सामान्य नागरिकांना पुरेशा सोयी–सुविधा उपलब्ध होत नव्हत्या. त्यामुळे पनवेल तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालय, कर्नाळा व तलाठी कार्यालय शिरढोण, सांगुर्ली या संबंधित तलाठी/मंडळ अधिकारी, तलाठी सजा कार्यालयाच्या इमारतींच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी केली होती.

शासकीय कार्यालयांची स्वत:ची इमारती असावी, जेणेकरुन जनतेला योग्य सोयी–सुविधा गतीने पुरविता येतील, या उद्देशाने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाचा पाठपुरावा करुन जिल्हा प्रशासनास त्याप्रमाणे निर्देश दिले. त्यानुषंगाने मौजे शिरढोण, ता.पनवेल येथील स.नं.३९ क्षेत्र २–३९–०० हेक्टर आर पैकी क्षेत्र ०–०७–१० हेक्टर आर ही शासकीय जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने मंडळ अधिकारी कार्यालय, कर्नाळा व तलाठी कार्यालय शिरढोण, सांगुर्ली करिता हस्तांतरित करण्याविषयीचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी पारित केले आहेत.

या निर्णयामुळे पनवेल तालुक्यातील नागरिकांना शासकीय सोयी–सुविधा मिळण्यासाठी निश्चितच गती प्राप्त होईल. शासकीय कार्यालयांसाठी स्वतःची शासकीय वास्तू असावी, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जातीने लक्ष देऊन अनेक शासकीय कार्यालयांचे प्रश्न मार्गी लावले आहेत.

## सर्पमित्र अजय भोसले याने दिले आठ फुट अजगराला जीवदान

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील नडवली गावचा सुपुत्र व सर्पमित्र म्हणून नावारूपाला आलेल्या अजय भोसले याने आठ फुटी लांबीच्या अजगरास सुरक्षितपणे पकडून जीवदान दिले आहे. मागील आठवड्यात त्याने त्याच्याच गावातील एका गुरांच्या गोठ्यात दडून बसलेल्या दहा फुट लांब असलेल्या धामण सापास जीवदान दिले होते.तर दोनच दिवसापूर्वी शेजारील तळवली या गावातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र बामणे यांच्या निवासस्थानी घराच्या पाठीमागील बाजूस अजगर असल्याची माहिती मिळताच अजय तेथे येऊन बिनधास्तपणे सुमारे आठ लांबीच्या अजगरास मोठ्या कौशल्याने पकडून जीवदान देऊन सुरक्षित जागेत नेऊन सोडले आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ

**ता.पनवेल, जि.रायगड**

### :– निविदा सूचना –:

मा.सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ ता.पनवेल, जि.रायगड यांच्या वतीने खाली स्वाक्षरी करणारे खाली नमूद केलेल्या कामासाठी टक्केवारी दराने मोहरबंद निविदा मागवीत आहेत तरी निवेदने पत्रे सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ ता.पनवेल, जि.रायगड यांच्या कार्यालयात कामाच्या दिवशी दिनांक २१/०७/२०२१ ते २७/०७/२०२१ अखेरपर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० कुंडेवहाळ पर्यंत निविदा फॉर्म मिळतील मोहरबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालय कुंडेवहाळ ता.पनवेल, यांच्या कार्यालयात दि.२७/०७/२०२१ रोजी सकाळी ११:०० कुंडेवहाळ पर्यंत स्वीकारण्यात येतील. शक्य झाल्यास त्या दिवशी दुपारी किंवा सरपंच ठरवतील त्या दिवशी निविदा ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील.

उघडलेल्या सर्व निविदा तुलनात्मक पत्रासहित पुढील मंजुरीसाठी खाली सही करणारा सरपंच ग्रामपंचायत कुंडेवहाळ यांचे कडे सादर करण्यात येते. सर्व निविदा स्वीकारणे किंवा फेटाळण्याचे हक्क खाली सही करणाऱ्यांनी राखून ठेवले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अं.प.रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|
| १) | कुंडेवहाळ येथील आदिवासी स्मशानभूमी येथे हायमास्ट बसविणे. (ग्रामनिधी) १५%मागासवर्गीय खर्च | १०००००/– | ६ महिने | |
| २) | कुंडेवहाळ गावांतर्गत सिडकोच्या लाईनला जोडून पाण्याची सब पाईप लाईन टाकणे. (ग्रामनिधी) | २९९०००/– | ६ महिने | |
| ३) | कुंडेवहाळ येथे नविन पाईप लाईन टाकणे व पाईप लाईन दुरुस्त करणे (१५ वित्त आयोग ) | ३९५३१०/– | ६ महिने | |
| ४) | कुंडेवहाळ, बंबावी अंगणवाडी डिजीटल करणे.(१५ वित्त) | ७११५५/– | ६ महिने | |
| ५) | कुंडेवहाळ येथील आदिवासी वाडी येथे हायमास्ट बसविणे.(१५ वित्त) | १२१९६४/– | ६ महिने | |
| ६) | कुंडेवहाळ येथील बंबावी ,कोळीवाडा येथे गणपती घाट तयार करणे व जोड रस्ता तयार करणे.(ग्रामनिधी ) | ३०००००/– | ६ महिने | |
| ७) | ग्रामपंचायत कुंडेवहाळ हद्दीतील गटर दुरुस्ती व साफसफाई करणे.(ग्रामनिधी) | ३०००००/– | ६ महिने | |
| ८) | ग्रामपंचायत कुंडेवहाळ हद्दीतील रस्ते दुरुस्ती व साफसफाई करणे.(ग्रामनिधी) | ३०००००/– | ६ महिने | |
| ९) | ग्रामपंचायत कुंडेवहाळ हद्दीमध्ये वाचनालय बांधणे.(ग्रामनिधी) | ३०००००/– | ६ महिने | |
| १०) | कुंडेवहाळ येथील विहिरीतील गाळ काढणे व दुरुस्त करणे.(ग्रामनिधी) | ३०००००/– | ६ महिने | |
| ११) | कुंडेवहाळ अंगणवाडीसाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था करणे. (१५ वित्त आयोग) | २००००/– | ६ महिने | |
| १२) | कुंडेवहाळ आदिवासी नविन पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणे व मोटर दुरुस्त करणे.(वित्त आयोग) | १७०८४७/– | ६ महिने | |
| १३) | कुंडेवहाळ ग्रामपंचायत मध्ये साथरोग नियंत्रण योजना राबविणे. (वित्त आयोग) | १२००००/– | ६ महिने | |
| १४) | कुंडेवहाळ ग्रामपंचायत हद्दीतील सर्व शौचालये दुरुस्ती करणे व टाकी मैला सफाई करणे.(वित्त आयोग) | ८००००/– | ६ महिने | |
| १५) | कुंडेवहाळ/बंबावी अंतर्गत पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे व मोटार दुरुस्ती अनुसंधिक कामे करणे.(वित्त आयोग ) | १२१६८७/– | ६ महिने | |
| १६) | कुंडेवहाळ गावातील विहिरींचा गाळ काढणे व साफ सफाई करणे.(वित्त आयोग) | ११००००/– | ६ महिने | |
| १७) | कुंडेवहाळ/बंबावी अंगणवाडी शौचालय व अंतर्गत कामे करणे.(वित्त आयोग) | १०३४६७/– | ६ महिने | |
| १८) | कुंडेवहाळ आदिवासी स्मशानभूमी दुरुस्ती करणे. | १७०८४७/– | ६ महिने | |
| १९) | कुंडेवहाळ ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना उदरनिर्वाहभत्ता/व्यवसायासाठी मदत करणे.(वित्त आयोग ) | ५१७३३/– | ६ महिने | |
| २०) | कुंडेवहाळ ग्रामपंचायत हद्दीतील गटर दुरुस्ती व साफ सफाई करणे.(वित्त आयोग) | ७५०००/– | ६ महिने | |
| २१) | कुंडेवहाळ ग्रामपंचायत हद्दीतील आपत्ती व्यवस्थापन व नियंत्रण उपाय योजना करणे.(वित्त आयोग) | १४४९५४/– | ६ महिने | |
| २२) | कुंडेवहाळ येथील सार्वजनिक शौचालय व गटारे दुरुस्त करणे. (ग्रामनिधी) | ३०००००/– | ६ महिने | |

अटी व शर्ती :–

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ**



## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक–१ पनवेल यांचे कार्यालय

### भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम क्रमांक ११ ची अधिसूचना

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक ११/२०१४/प्र.क्र.७७ (पार्ट–२)/अ–२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमिसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या 'अनुसूची एक' मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या 'अनुसूचि दोन' मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या 'अधिसूचि तीन' मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या 'अनुसूचि चार' मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या 'अनुसूचि चार' मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकांस उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सुट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अ नुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव : पारगांवडुंगी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | २ | 0.१३.00 |
| २ | ३७/१९ | 0.0६.६0 |
| ३ | ३७/२३ | 0.३६.२0 |
| ४ | ३७/२५ | 0.0१.७0 |
| ५ | ३७/२६ | 0.१८.१0 |
| ६ | ४0/९ | 0.३१.६0 |

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| अधिसूचना प्रकल्पाचे नांव : | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तद्नुषंगिक कामे |
| निर्माण प्रकल्प कार्याचे वर्णन : | नवी मुंबई विमानतळ क्षेत्रामध्ये प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तद्नुषंगिक कामे या राष्ट्रीय महत्वाकांक्षी प्रकल्पाकरिता जमीन संपादन करणे |
| करण्यापूर्वी समाजाला मिळणारे लाभ : | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे नियोजित नागरी सुविधांचा लाभ समाजातील सर्वच स्तरातील लोकांना होईल. |

**अनुसूची–तीन**

| | |
|---|---|
| बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यांस भाग पाडणारी कारणे : | प्रस्तावित जमिनीच्या भूसंपादनामुळे ६ खातेदार विस्थापित होतील. |

**अनुसूची–चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश**

पारगांवडुंगी येथील १.०७.२० हे.आर. ही जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडको करिता नवीन भूसंपादन कायद्यांतर्गत करण्यात येत आहे. नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंतर्भाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवीन प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यावर पोहोचला आहे. खऱ्या अर्थाने मुंबईला पर्याय म्हणून हे शहर विकसित झाले आहे. नवी मुंबई विमानतळाच्या कामाने वेग घेतला असून याचा मोठा फायदा आजूबाजूच्या गावांना होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे निर्माण कार्य प्रगतीपथावर असल्याने पारगांवडुंगी गावाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. विमानतळ परिसरात लागणाऱ्या सोयी सुविधाकरिता पारगांवडुंगी गावातील जमीन भूसंपादनाकरिता प्रस्तावित आहे. विमानतळ परिसरातील नागरी सुविधांकरिता सदर जमिनीची नितांत आवश्यकता आहे. सदर जागेचा वापर विविध नागरी सुविधांकरिता होणार असल्याने अंतिमतः याचा लाभ समाजाला होणार आहे.

**अनुसूची–तीन**

| | |
|---|---|
| नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल : | प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली नाही. |

ठिकाण : पनवेल दिनांक १४/०७/२०२१

**सही/–**
**(वैशाली परदेशी–ठाकूर)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**मेट्रो सेंटर क्रमांक–१ पनवेल**

जिमाका/राअ/जाहि/७६/२०२१–२२